**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृहे यामधील प्रवेशामध्ये ३% आरक्षणाबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणेबाबतचे मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा.क्र.विससं/उशि/कोवि/अनि-१/२०१६/३१२८, दि.२१ जून, २०१६ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना व विद्यापीठास अवगत करावा.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 47
दि. 27 JUN 2016

# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
### राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

**Web : www.jdhekop.org,** **Email ID- jdhekop@gmail.com**

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/अनि-१/२०१६/३१२८ दि.२१ जून, २०१६

<u>तात्काळ/कालमर्यादेत</u>

प्रति,

१) कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२) प्राचार्य,
सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र,
अनुदानित महाविद्यालये, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

विषय : अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये,शाळा, वसतिगृहे यामधील प्रवेशामध्ये ३ % आरक्षणाबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणे बाबत. .

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्र.उशिस/२०१६/अपंग/मवि-१/४९११ दि.१७.०६.२०१६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय संचालनालयाच्या पत्राचे अवलोकन व्हावे. संदर्भिय पत्रामध्ये दिलेल्या सुचनांनुसार अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृह यामधील प्रवेशामध्ये ३ % आरक्षणाबाबत कार्यवाही करण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी व्हावी व सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून अपंग विद्यार्थ्यांचे शारिरीक श्रम कमी व्हावेत याकरीता शाळा महाविद्यालयांबरोबरच वसतिगृहामध्ये अपंग विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत सूचना आहेत.

तरी, विषयाकिंत बाबत आपल्या महाविद्यालय/विद्यापीठात उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबत - संदर्भिय पत्र

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.

प्रत : मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर